# प्रकरण पाचवे

## प्रकरण ५ वे

# मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेली स्त्रीमनाची भाव स्पंदने

### प्रस्तावना :

प्रबंधिकेच्या पाचव्या प्रकरणात मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेल्या स्त्रीमनातील विविध भाव-भावनांचे स्पष्टीकरण केले आहे. प्रारंभीच्या संग्रहातून जाणवणारी आणि प्रेमाच्या संदर्भात स्वीकारलेली सामाजिक अलिप्तता, नायिकेला असलेली मुक्त जीवनाची ओढ प्रण्यातुरता साजणाची ओढ, प्रतिक्षा, मीलनोत्सव, मानसिक आणि शारीरिक प्रेमाचा उल्हास अशी विविध भावरुपे मंदा कदम यांच्या काव्यातून प्रकट झाली आहेत.

कवयित्री गेली वीस ते बावीस वर्षापासून अधिक काळ कविता लिहीत आहे. या कालखंडात सामाजिक वास्तव बदललं, अभिरुची बदलली, आधीच्या,समकालीनांच्या आणि सध्याच्या कवींनी आपल्या परीने काव्यातून स्त्रीरुपे मांडली. या सर्व पसाऱ्यात कवयित्री मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळ, चंदनाचे देणं आणि ऋतुनाद या संग्रहातून प्रकट होणाऱ्या स्त्रीमनाचा शोध घ्यावयाचा आहे.

### मंदा कदम यांच्या कवितेतील स्त्रीमनाचे भाव :

कवयित्री मंदा कदम यांची सर्वत्र आढळणारी कविता ही भावकविता आहे. हे भाव कवयित्रीच्या मनात निर्माण होतात. आणि शब्दांच्या माध्यमातुन प्रकट होतात. त्यामुळे प्रेमकविता, निसर्गकविता, कौटुंबिक वात्सल्यभाव प्रकट करणारी कविता, निसर्गाच्या हालचालीतून जाणवणारी इंद्रियसंवेदना, सामाजिक विपन्नावस्थेत गुदमरलेलं स्त्रीमन, आदर्श स्त्रीरुपाची कविता अशा विविध पातळ्यांवर स्त्रीमनाचे भावतंतू उलगडताना दिसते.

वसंत बापट, मंगेश पाडगांवकरांच्या कवितेशी याबाबत मंदा कदम यांची कविता नाते सांगते. वसंत बापट किंवा मंगेश पाडगांवकर यांची कविता ज्याप्रमाणे स्त्रीत्वाच्या अंगाने समजून घेता येते त्याप्रमाणे मंदा कदम यांची कविता अनुभवायास मिळते. मराठी कवितेत बापट, पाडगांवकर यांच्याही पूर्वी भा. रा. तांबे, इंदिरा संत, बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून स्त्रीमनाचे भाव विविध पातळ्यावर प्रकटलेले आहेत. अर्वाचीत कवी ना. घ. देशपांडे, पु. शि. रेगे, ना. धों. महानोर यांच्या काव्यातून स्त्रीरुपाचे दर्शन घडते. यादृष्टीने पाहता पु. शि. रेगे यांच्या साहित्यसृष्टीत

निसर्गाच्या रंग-रस-गंध-नाद स्पर्शमयी रुपांतून 'स्त्रीचे' नित्य नवे दर्शन घडते. ही स्त्रीशक्ती रेग्यांच्या कवितेची मूळ प्रेरणा आहे. तर निसर्ग आणि स्त्री ही दोन प्रमुख अनुभूतिकेंद्रे, ना. धों. महानोरांच्या कवितेला आहेत.

मंदा कदम यांची कविता पूर्णपणे (मी, मला, माझ्या) स्वत:सच प्रगट करते आहे. वास्तवता आत्मप्रकटीकरणाची हौस प्रत्येकाला असते. तसेच ती कवयित्रीला ही आहे. ह्याचे बीज आपल्याला संत काव्यात सापडते. महदंबा, मुक्ताबाई, जनाबाई, वेणाबाई, बहिणाबाई या संत कवयित्रींनी आपल्या काव्यातून मोठ्या प्रमाणात 'स्व'ला प्रकट केले आहे. वात्सल्य, कोमलता, सहनशीलता त्यागमयप्रवृत्ती आणि भावसघनता हे स्त्री हृदयाचे विशेष त्यांच्या अभंग ओव्यातून दिसून येतात.

मराठीत कविता निर्माण झाल्यापासून 'स्त्री' हा काव्याचा महत्वाचा विषय झाला आहे. विशेषत: स्त्रीची विविधरुपे प्रेमकाव्यातून अधिक आलेली आहेत. अशी ही स्त्री या विश्वाच्या प्रक्रियेत एक मुलभूत महत्वाच घटक आहे. अशी माझी निष्ठा आहे. असे ना. घ. देशपांडे म्हणतात. प्राचीन काळापासूनच्या बहुतेक काव्यकृतीत तिचेच गोडवे आहेत. ती एक सृजनाची महत शक्ती तर आहेच पण जीवनात आकर्षण उत्पन्न करणारी एक मंगलमय प्रेरणाही आहे असे ना.घ. म्हणतात.

कवयित्री मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेली स्त्रीमनाची भावस्पंदने विविधांगी प्रसंगातून प्रकट झाली आहेत. कधी ती प्रीतीच्या कोंदनातून तर कधी निसर्गाच्या प्रतिमांतून. कवयित्रीला मात्र प्रेमाचे मोठे आकर्षण आहे. त्यांच्या संपूर्ण संग्रहातून प्रेमभावनेच्या विविध छटा व्यक्त झाल्या आहेत. कवयित्री म्हणते की, प्रेम हा अखिल सृष्टीचा स्थायीभाव आहे. मानवी सृष्टीततर या जाणीवेला अधिक अर्थपूर्णता असते. एखाद्या श्यामल सायंकाळी प्रेमपारवा घुमणे, प्रेमबाधा होणे, प्रेमाच्या ताणाबाणामुळे बोली अबोली बनणं किंवा शब्दांच्या सीमा संपून मौनाच्या प्रवासाला सूरुवात होणं या प्रेमाच्या पथावरील स्वाभाविक श्रेणीला कातरवेळेचे सहाय्यच होत असते.

## नात्याबद्दल प्रकटलेला स्त्रीभाव :

तिथेच जाऊ (कातरवेळ क.क्र.१९) या कवितेत कवयित्री मानवी नातेसंबंधाविषयी आपल्या भावना प्रकट करते ती म्हणते -

का न असावी असली माती
जिथे अनामिक नाती रुजती

अनामिक नातें हे नातं असं आहे की, ज्यामध्ये व्यावहारिकता नसते, विनीमय प्रदर्शन नसते तर विशुध्द मनाने केलेली प्रीत असते. मग अशा चाकोरीबाह्य समजल्या जाणाऱ्या नात्यांसाठी समाजमान्यता का मिळू नये असे तिला वाटते. म्हणून ती म्हणते,

सख्या साजना तिथेच जाऊ
जग मायावी जिथे न स्वार्थी
व्यवहाराचे कंटक भेदून
जिथे विमुक्तच फुलते प्रीती

जिथे या स्वार्थी, व्यवहारी जगाचे कुंपण नसेल, जिथे प्रेमाच्या पवित्र नात्याला आखिव तटबंदीची चौकट नसेल, जिथे खुल्या दिलाच्या दर्शनमात्रे ह्रदय मनोगत हसावे. ह्रदयामधला उभा दिलासा जिथे कुणाला बुरा वाटणार नाही ह्या भूमीतच ही विमुक्त प्रीती फूलेल.

या कवितेत ही कल्पना कवी माधव ज्युलियन यांच्या 'तिथे चल राणी' या सुप्रसिद्ध कवितेशी मिळती जुळती आहे. या कवितेतील साजण आपल्या प्रेयसीला म्हणतो,

सामाजिक संबंध सखे, हे न टिकाऊ
हे स्नेह दिखाऊ
मी तुज, मला तू, प्रभू दोघास निदानी
व्हा बध्द इथे, प्रेम करा वा न कराही
नाते दृढ राही

माधव जुलियन यांनी प्रेमाच्या रुढ संकेताविरुद्ध बंड पुकारण्याची भाषा केली. प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे निष्ठा, प्रेम म्हणजे नि:स्वार्थी वृत्ती हा पराकोटीचा विचार कवितेत माधव जुलियन यांनी मोठ्या परिणामकारकपणे प्रकट केलेला आहे. (स्वप्नलहरी १९६६ पृ. २०)

साजणवेळामध्ये भेटणारा साजण हा त्या स्त्रीचा सखा आहे, सांगाती आहे. आयुष्याचा खडतर प्रवास करीत असताना तो नायिकेच्या मागे उभा आहे. तो तिला मानसिक बळ देतो. आशेचे आनंददायी आश्वासन देतो. हा साजन मानवी पारिवारिक नात्याच्या पलीकडचा आहे. म्हणून नायिका विचारते.

हवे कशाला तुजला कोंदण
या नात्याचे या नात्याचे ?

'हवे कशाला' या कवितेत भेटणारी ही नायिका मानवी नातेसंबंधाबद्दल आपल्या भावना प्रकट करते. खरं तर पारंपारिक नाते संबंधात मोठ्या प्रमाणात विनिमय प्रदर्शन असते. लौकिकतेचे सर्व पाश त्याच्या भोवती गुंडाळलेले असतात. त्यामुळे त्याच्यावर फार दडपण येते. परंतु मानवी जीवनातील आनंदविभोर क्षण मनात साठवताना हे नातं विसंगत नाही का ? असा प्रश्न ती करते.

मोराचे नाचणारे थवे पहायाचे, शरदाचे चांदणे केसात माळायचे, ढगांचे तेज कवळायचे आणि जीवनातल्या अंधाऱ्या वाटा उजळत उजळत दिगंतात विरुन जायचे. दोघांची साथ सोबत आठवीत आठवीत पुन्हा एकत्र यायचे.

येथे उदात्त अशा प्रेमाचे उत्कट दर्शन घडते. मानवी जीवनावर प्रेमाचे चांदणे पसरविणारा उदात्त व्यक्तिमत्वाचा हा साजण आहे. सर्व सामान्यपणे इथे कवयित्रीने जीवन हेच स्वप्न आहे हे सत्य सांगितले आहे.

रेशीम नातं, विनंती ह्या कविता अनामिक अशा नातेसंबंधातील प्रेमभावना प्रकट करणाऱ्या आहेत.

## उत्कटभाव :

बहुतेक कवयित्रीप्रमाणे प्रेम हा मंदा कदम यांच्या काव्याचा विषय प्राधान्याने आहे. प्रेमभावनेच्या प्रवासातील सगळे टप्पे त्यांच्या काव्यातून दृगच्च होतात. विलक्षण हुरहूरता, प्रियकराची आर्त प्रतिक्षा, मनाला लागलेली ओढ, जुन्या आठवणीने आनंदुन जाणारे मन हे स्त्री मनाचे जाणवणारे उत्कटभाव त्याचे प्रतिबंब दिसून येते ते त्यांच्या कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनाद या संग्रहातून. प्रतिक्षा या कवितेत ती म्हणते,

किती पाहिली मी वाट
दारी शिणला रे माड
परी मिटवू कसे मी
माझ्या मनाचे कवाड

या कवितेत स्त्रीला आपल्या प्रियकराच्या मीलनाची आस लागलेली आहे. त्याची वाट पाहून पाहून तिच्याप्रमाणेच तिच्या दारातील माड शिणून गेला आहे. आर्त प्रतिक्षा करणाऱ्या स्त्रीमनाचे

दर्शन इथं घडते. आयुष्याच्या शेवटपर्यंत तिला त्याच्या भेटीची ओढ आहे. त्याच्या मीलनाची प्रतिक्षा करणाऱ्या एका आश्वासक स्त्रीमनाच्या भावन इथे स्पष्टपणे प्रकट होतात.

'आठवण' (कातरवेळ क्र. १८) कवितेतील 'स्त्री' ही आपल्या मनामध्ये उसळलेल्या भावनांना व्यक्त करते आहे. तिला सायंकाळ संपूर्णत: उदास भासते. पश्चिमेच्या क्षितिजावर उमटलेले इंद्रधनुष्याचे रंग आणि त्या आभाळ रंगात हरवलेले मन, अंतराळात भिरभिरणाऱ्या चिमुकल्या पक्ष्याप्रमाणे सांजवेळच्या चारही दिशांना फिरणारे तिचे मन दिवे लागणीच्या वेळी मात्र त्याच्या आठवणीने मोहरुन येते. बेभान होते.

तेंव्हा मात्र या कवितेतील अशाच आठवणीचा गहिरेपणा जाणवतो तो 'तेंव्हा मात्र' (कातरवेळ क्र.२०) कवितेत 'ती' म्हणते की मी विसरते असंख्य रात्रीचे पळसवणवे, त्यांचा निखारा, प्रदीर्घ मध्यान्हीच्या वेळी ऐकू येणारा तुझा स्वर, एक स्वप्न म्हणून मी विसरते पण

सर्व दिशांनी
धावत येते, कातरवेळ
तेंव्हा मात्र
छळत राहते तुझी आठवण
हट्टी मुलासारखी

कातरवेळी प्रेमीजनांना मोठ्या प्रमाणात व्याकुळता जाणतवे. तिन्ही सांज करकरणारी वाटू लागते. कातरवेळी रानपाखरांचा स्वर अशुभ वाटू लागतो. एक प्रकारची विलक्षण हुरहुर मनात दाटून येते. अशा वेळी तिला त्याची आठवण हट्टी मुलासारखी छेडते.

ही कविता जुन्या गहिऱ्या आठवणींची जाणीव करुन देते. ज्याप्रमाणे मानसाच्या आयुष्यात प्रथम घडणाऱ्या गोष्टीचा आनंद भरभरुन वाहणारा असतो. त्याप्रमाणे जुन्या गहिऱ्या आठवणींचेही असते. त्या जाता जात नाहीत. आयुष्यभर माणसाला सोबत करतात. मानवी मनातील जाणवणारा हा उत्कटभाव विलक्षण असा आहे.

'साजणवेळा' संग्रहातील कविता काही अपवाद वगळता संपूर्णत: नायिकाप्रधान आहे. नायिकेच्या अंतरीच्या भावनांची ही तरल हळवी स्पंदने आहेत आणि ती मुख्यत: साजण आणि निसर्गविषयक स्पंदने आहेत हे इथे महत्वाचे. प्रत्येक कविता मुर्त-अमुर्त प्रेमभावनेने ओथंबलेली

आहेत. कवयित्रीने मनोगतात सांगितल्याप्रमाणे ही प्रीती वेगळ्या स्तरातील आहे. उत्कट आहे. खोल आहे. समर्पणशील आहे. अतीव प्रीतीतून निर्माण होणारी अतूट भक्ती हृदयात जपणारी आहे.

प्रीतीचे विविध अविष्कार अनेक कवितेतून सहज सुंदरतेने कवयित्री अभिव्यक्त करते. येथे साजणाची विविध रुपे अनुभवयास मिळतात. त्याचे मन कसे ? त्याच्या भेटीची आर्तता, ताटातूट, दूरत्व, दीर्घप्रतिक्षा, कधी अकल्पित भेटीचा सोहळा तर कधी भेटीच्या स्मृती यासारख्या तरल अनुभूती निर्माण होतात. अशा सर्व भावकल्लोळात गुदमरलेल्या स्त्री मनाचे दर्शन आपल्याला घडते ते साजणवेळामध्येच. केशरभेट कवितेत ती म्हणते,

दूर थांबला साजण
मध्ये अनोळखी पाणी
डोळा तुडुंब वादळ
उरी मौनावली गाणी

इथे नायिकेला साजणाच्या भेटीची असणारी आतुरता दिसून येते. पुढे ती म्हणते.

शब्दापल्याड साजण
किती झाली पानझड
कुण्या केशरभेटीची
पुन्हा पापणीत ओढ ।

ह्या कवितेतील नायिकेच्या डोळ्यात वादळ घोंगावले आहे. उरात पाणी मूक झाले आहे. बरीच संकटे येऊन गेली आहेत. आणि म्हणून साजणाच्या केशरभेटीची ओढ साजणीच्या पापण्यांना लागून राहिली आहे.

या कवितेत प्रियकराच्या मीलनात उत्सुकता असलेल्या स्त्रीच्या भावमनाचे दर्शन घडते. कवितेत असणारी लयबध्दता, रेखीवता, नादमयता आणि तरल भावनांचे उत्कट आविष्कार यामुळे ही कविता असाधारण झाली आहे.

अशीच तीव्र ओढ 'अस्तित्व' या कवितेतील स्त्रीमनाची दिसून येते. एकटेपणा, वर्तमान जीवनातील दु:ख, वेदनेचा उमाळा तर कधी भूतकालीन प्रेमाची याद या स्त्रीच्या सूक्ष्माती सुक्ष्म भावनांना कवयित्रीने काव्यात बंदिस्त केले आहे. 'केशरभेटीची साजणीच्या पापण्यांनी जी ओढ

लागली आहे. या ओढीचे कारणच असे आहे की त्या साजणाचे अस्तित्व जगण्याला एक निरागस सुंदरता देऊन जाते. म्हणून ती म्हणते,

तु असताना अवती भोवती
काट्यांनाही येते कवळीक
दूरदूरच्या ताऱ्यांशीही सहजच
जुळते, मंथर जवळीक

या साजणाच्या सहवासाने चाफा फुलतो. बाबुळरानात घरटी झुलतात. झाडंदेखील उन्हात गीत गाते. गवताला रंगीत फुले येतात. आणि फांदी फांदी डवरुन येता । गाठ रेशीमी उरात सलते असाहा साजण निसर्गातच चैतन्य निर्माण करतो. त्याच्या सहवासात निसर्ग मोहरुन जातो आणि साजणाचीही स्थिती तशीच होते.

या काव्यातून प्रियकराच्या सहवासाची अपेक्षा करणाऱ्या स्त्रीच्या भावमनाला कवयित्रीने प्रस्तुत केले आहे. असे असले तरी त्याच्या अंतरंगात प्रवेश करताना त्यातून अध्यात्मिक प्रीतीचा साक्षात्कार सूचित होतो. कवयित्रीने मनोगतात स्पष्ट केल्याप्रमाणे कवयित्रीचा साजण हा परमेश्वर आहे. निसर्गचैतन्याचा अर्थ सांगणारी ही कविता अर्थसंपन्न, अल्पाक्षररमणीय अशी आहे. 'संतू' कवितेतील स्त्री ही आपल्या प्रियकराच्या आठवणींना सोबती करुन जीवन जगते आहे. ती म्हणते,

आठवणींचे सागरगोटे
पुन्हा पुन्हा मी करिते गोळा
घोंघावत पण येते वादळ
उधळून जातो डाव मांडला

या कवितेतील स्त्रीने आपल्या भावनांना मूर्तरुप देताना मानवी जीवनात असणारे नियतीचे स्थान स्पष्ट केले आहे.

अतिशय प्रभावी कल्पनेतून स्त्रीमनातील भाव कवयित्रीने इथे दृगच्चर केले आहेत. आपल्या प्रियकराच्या आठवणीने व्याकूळ झालेली स्त्री प्रियकराला प्रश्न करते की,

किती दूर तू किती दूर मी
कुणी कुणाला विसरायचे
कसे कधी अन् किती किंतीसे

आपणा दोघांमध्ये असणारे हे अंतर फार दुरचे आहे. आपण उधळलेले प्रीतीचे रंग, भावनांची झालेली गुंतागुंत माझ्या सर्वांगाला लपेटून बसली आहे. त्यामुळे याक्षणी कुणी कुणाला विसरायचे असा आर्त स्वर ती काढते.

इथे स्त्रीमनातील उत्कट भाव तितक्याच उत्कटपणे प्रीतीचे दर्शन घडवितो. इथली नायिका विनयशिलपणे आपले भाव प्रकट करते. प्रेयश्रणांना प्रस्तुत करताना कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश, आक्रंदन, उतावीळपणा जाणवत नाही. त्यामुळे ही कविता असाधारण झाली आहे. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

'ऋतुनाद' संग्रहातील कवितांतून कवयित्री मंदा कदम यांनी निसर्गप्रतिमांतून मानवी भावनांचे पकटीकरण केले आहे. आकाश, पाऊस, वारा, झाडे, पाने, फुले, माती या प्रतिमा स्त्री-पुरुष मनाचे भाव प्रस्तुत करणारे घटक आहेत. निसर्गप्रतिमांतून स्त्रीमनातील उत्कटभावाचे दर्शन घडते ते ऋतुनादमध्ये. ती म्हणते,

आभाळ उभे डोळ्यात
डोळ्यातून झरती धारा
रमलास कुठे तू राजा
ये उधळित वादळवारा

पावसाच्या (प्रियकराच्या) प्रतिक्षेने ह्या स्त्रीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले आहेत. अशावेळी ती विनवणी करते की,

ये सोड अबोला आता
जा शिंपून अवघी धरती

इथे जाणवणारा अनुभव उत्कट असा आहे. स्त्रीमनाने आपल्या प्रियकराला पाऊसधारेतून घातलेली साद उत्कट अशी आहे.

ऋतुनादमध्ये पाऊसधारा, निसर्गराजा आणि हिमंवती या तीनही विभागातून येणाऱ्या निसर्गप्रतिमा आणि- त्यातून व्यक्त झालेले 'स्त्रीमन' संयोगशृंगाराबरोबर वियोगाचेही दर्शन घडवितात.

मीलनोत्सुकता, मीलनानुभव, विरहता, आटवणी हे सगळे स्त्रीभाव इथे व्यक्त होतात. त्यामुळे ऋतुनाद संग्रहाला एकवेगळेपण लाभते.

**विरहीभाव :**

कवयित्री मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा आणि ऋतुनाद ह्या संग्रहातून जितक्या प्रमाणात उत्कटभाव, उत्फुल्ल, प्रेमभाव दिसून येतो त्या प्रमाणात त्यांच्या कवितेतून विरहाचा, निराशेचा, एकाकीपणाचा सूर अधिक तीव्र आहे. बहुतांशी कवितांतून वियोगाचे दु:ख उरी जपत जगणाऱ्या जीवाचे आक्रंदन प्रकर्षाने जाणवते. मीलनोत्सुकता, प्रतीक्षा, आठवणीत चूर होणे या प्रेमभावनेच्या भावशलाकाबरोबर अस्वस्थता, विरह वंचना यांचे चित्रण त्यांच्या कवितेत दिसते.

सांजवताना ही विरहाची भावना आणखी गडद गहिरे होते. हळूहळू काळोख आसमंताला व्यापून टाकीत असताना या एकाकी प्रेमिकेचे हृदय आपल्या दुरावलेल्या प्रियासाठी झुरु लागते. जीवभाव हाती वरमाला घेतलेल्या कन्याकुमारीसारखे अचल असतात पण पश्चिम वाऱ्याचे आवर्तन सुरु होते. जेंव्हा जाई, जुई मोगरा फुलू लागतो. जेंव्हा आभाळीची चांदणीही हळूच चंद्राकडे सरकते तेंव्हा मात्र ती सांज वणव्यामागून वणवे पेटवीत जाते. प्रेमिकांना जाणवणारी विरहता ती याचवेळी 'आरास' या कवितेत प्रियकराच्या सहवासाचा आनंद लुटताना सावरीच्या कापसासारखे हलके होणारे मन हर्षाच्या पावसात नाहते. पण सायंकाळी मात्र ती 'आरास' त्याच्या वियोगामुळे उतरते. ती म्हणते,

सांजवाती समय
सरलेला सहवास
भरलेल्या नयनांनी
उतरलेली आरास

रस्ता (कातरवेळ क. क्र. २४) कवितेतील स्त्री मात्र एकाकीपणाचे दु:ख व्यक्त करते आहे. ती म्हणते,

केवढा मोठा रस्ता वाटचाल संपत नाही
माथ्यावरती उन्हच उन्ह झाडांचा तर पत्ताच नाही.

या एकाकी रस्त्यावर मायेचा ओला स्वर उगवत नाही की एखादे हळवे पीस वाऱ्यावरती तरंगत नाही. जीवाला हताश करणारा हा रस्ता असाच काटायचा आहे.

इथे आयुष्य उपभोगताना या स्त्रीच्या वाट्याला एकदाही प्रेमासारखा आनंदी क्षण आला नाही याची तिला खंत आहे. मग असंच दु:ख घेवून जीवन जगायचे का ? असा प्रश्न स्वत:लाच ती करते पुढे ती म्हणते की,

किती किती सरली वळणे हे ही नेमके स्मरत नाही
कडा कुठे तुटणार आहे हे ही सांगता येत नाही

आयुष्यात कितीतरी चढउतार आले. आज निश्तिपणे आठवत नाही पण भविष्य कसे असणार हे ही सांगता येत नाही. इथली नायिका एक प्रकारे जीवनातले गहिरे दु:ख प्रकट करते. मात्र या दु:खात कुठेही भावनाविवशता नाही. आक्रंदन नाही. सरळसाधेपणाने व्यक्त झाले आहे.

प्रियकराच्या विरह वणव्यात भाजून निघणाऱ्या या स्त्रीला वाटते की निदान (क.क.२१) वैशाख वणव्यात होरपळणारी माती तरी व्हावे. तिला तिच्या आषाढधारात भिजून चिंब होता येईल किंवा उद्ध्वस्त घर तरी व्हावे की ज्याला त्याच्या आडव्या-उभ्या सरी चिंब भिजवतील, नाही तरी शेवटी त्याच्या चैतन्याने भरभरुन वाहणाऱ्या नदी, नाले, तलाव, ओहाळातील पाणभवऱ्यात अडकलेले काष्ट तरी व्हावे.

इथे प्रियकर आणि प्रेयसीच्या एकरुपतेची सीमा झाली आहे. कैद (कातरवेळ ४७) या कवितेत दु:ख वेदनेने व्याकुळ नायिका कळत नकळत स्वत:ची तुलना कोसळत्या मृगधारेशी करते या धारा आभाळीच्या वेदनेला स्वत: झरुन मुक्त करतात. आभाळीचे उरीचे दु:ख पाझरल्याने हलके होते. पण तिच्या वाट्याला हे ही सुख मिळत नाही. कोंदलेले तिचे दु:ख मोकळे न होता व्यर्थ कैद भोगत राहते.

आयुष्यात प्रियकराच्या विरहाचे दु:ख वाट्याला येते तेंव्हा तिला वाटते की,

माझ्याच प्राक्तनाचे मज भोवले इषारे
गेल्या निघून वाटा पायतळी निखारे ।

कधी त्याच्या सावळ्या स्मृतींची वरात मनात येते तेंव्हा तिच्या हृदयास अश्रूत वाहणारे मौन असते. तिच्या हृदयभूमीत वीजगाणी पेरुन, किनाऱ्याला स्पर्श करुन जाणाऱ्या प्रियकराला ती म्हणते,

फुलवून गंधकलिका खुटल्यास पाकळ्या का
का घाव घातलेसी वृक्षापरीच गहिरे

(कातरवेळ पृ. क्र. ५५)

'कातरवेळ' ही अशी जीवाला हुरहूर लावणारी, अबोध दु:खाने झरझरायला लावणारी वेळ. सारे आयुष्य पाऱ्याप्रमाणे हातून निघून गेलेले असते. एकाकीपणाची व्यथा उरी घेवून जगताना तिला वाटते,

ही भयान कातरवेळा निष्पर्ण तरुंच्या छाया
घेऊन झडीची दु:खे जातात कुठे या राया
मनी उदास वाती जळती काळोख परी ना सरतो
जरी चंद्र झऱ्याच्या काठी मी कधी विसावा घेतो (कातरवेळ पृ. क्र. ५६)

बऱ्याचवेळा आपल्या प्रियकराची भेट होत नाही म्हणून प्रेयसी उदास होते. कित्येक युगे ही नायिका त्याची प्रतीक्षा करते आहे. तो येईल आणि साऱ्या आसमंतात सुगंधाची उधळण होईल. परंतु वाट पाहुनही त्याचे आगमन होत नाही तेंव्हा ती आर्ततेने व्याकूळतेने विचारते की,

किती युगांची प्रतीक्षा
किती युगांची असोशी
जीव व्याकुळ होऊन
प्राण आले गा कंठाशी

(ऋतुनाद पृ. क्र. २)

असा हा निसर्गाच्या चैतन्यात भरभरुन राहिलेला प्रियकर त्याविषयी नायिका म्हणते,

दडी मारुनिया बसे
त्याची सदाचीच रीत
काय लावितसे जीवा
जगा वेगळीच प्रीत

(ऋतुनाद पृ. क्र. २४)

कुठे तरी दडी मारुन बसलेल्या प्रियकराला ती विचारते की तुला निभावता येणार नव्हते तर तू मला प्रेम का दिलेस ? का जीवाला जीव लावलास ? त्याच्या या वागण्यामुळे तिला अपार दु:ख झाले आहे. उर धपापून जातो आहे. मनाची उलघाल होताना डोळ्यातुन त्याच्या वियोगामुळे धारा

वाहू लागतात. या कवितेत व्यक्त झालेल्या स्त्रीमनाचे भाव -वियोग शृंगारामुळे अतिशय उत्कट झाले आहेत. निसर्गाच्या आधारे कवयित्री हे भाव व्यक्त करते ती म्हणते,

किती दूर तू किती दूर मी
खिन्न काजळी क्षितीजापाशी
रानफुलांच्या पाऊलवाटा
रानफुले उदास होती
लख्ख मोकळे उन परंतु
सांज दाटते नभात पुरती

(साजणवेळ पृ. क्र. ३२)

अशी इथली स्त्रीची उदासीनता तिच्या मनात आणि निसर्गात दाटणारी आहे. म्हणून ती शेवटी म्हणते,

खंत नाही खेद कशाचा
विसर मला परि फुलत रहा तू.

या कवितेतील नायिकेची ही सदिच्छा तिला उदारपणाचे आणि उदात्ततेचे लेणे चढवून जाते.

एकंदर मंदा कदम यांच्या काव्यातून जाणवणारी प्रेमभावनेच्या प्रवासातील विरहीभावना गहिरी आहे. हे दु:ख व्यक्त करताना कवितेत एकसुरीपणा जाणवत नाही. वेदनेचे इथे संयमित प्रदर्शन आहे. प्रियकराला अथवा दैवाला दोष न देता, सहानुभूतीची मागणी न करता तटस्थ आणि धीरगंभीर वृत्तीने एकाकी वाट तुडविताना उरातील व्यथांना इथे काव्यात शब्दरुप आलेले आहे. हे वियोगी मनाचे हळवे आक्रंदन आहे आणि संवेदनशील मनाने त्या दु:खाला स्वीकारले आहे.

सर्वच काव्यातून विरहयोगाची दाट छाया पसरलेली असताना उरी उठलेल्या ह्या वेदनांचे संयमित आक्रोश कवितातून व्यक्त झाला आहे. हेच मंदा कदम यांच्या काव्याचे, प्रतिभेचे एक विशेष आहे.

## शृंगारभाव :

स्त्री-पुरुषाचे शरीर-मन तसेच नाजूक, सुक्ष्म अशा त्यांच्या अवस्था हेच कवीच्या जाणिवेच केंद्र असते. जीवनातील हा रतिभाव त्यांच्या काव्याची मुख्य प्रेरणा असते. कवयित्री मुलत:

अभिव्यक्तिवादी आहे. आपल्या अनुभूतीच्या कक्षा तिने आपल्या कवितेत जाणिवपूर्वक स्पष्ट केल्या आहेत. त्या अनुभूतीत सौंदर्याकाराला फार महत्व आहे. तसेच शृंगारभावालाही महत्व दिले आहे. त्यांच्या या दृष्टीमुळेच मंदा कदम यांची ऋतुनादमधील कविता सौंदर्यनिष्ठ आणि शृंगारप्रधान झाली आहे.

निसर्गधर्म हा आपल्या धर्मानुसार नवसर्जनाची क्रिया करीत असतो. ह्याच निसर्गधर्माचे आकर्षण कलावंतांना असते. कलावंताच्या मनाचा सर्जनशील धर्म निसर्गाच्या सर्जनशील धर्माशी समान असतो. निसर्गामध्ये विविध प्रकारची झाडे जन्मतात, त्यांना पाने येतात, फुले येतात, मोहर येतो, नवी फळे येतात आणि पुन्हा मोहर येतो हे सर्व निसर्गधर्मानुसार येत असतात. किंबहूना झाड ही पानांची माता बनते म्हणून झाडालाही मानवीधर्म लाभतो.

स्त्री-पुरषांना जन्मत:च एक विशिष्ट मानवी देह लाभलेला आहे. पुरुषांचा हा जन्मसिद्ध देह बदलत नाही. परंतु स्त्रीचा देह बदलत जातो. निसर्गामध्ये ज्याप्रमाणे जन्मणे, वाढणे, बहरणे, फळ येणे ह्या क्रिया घडतात तसेच स्त्री ही ऋतुमती, गर्भवती, पुत्रवती या अवस्थांतून जाते. या अवस्थांतुन जात असताना तिचे शरीर व मन बदलत असते. त्यामुळे कलावंत आपल्या कलाकृतीत निसर्गातून मानवी भाव प्रकट करतात.

कवयित्री मंदा कदम यांच्या कवितेतून पूर्णपणे शरीर आकर्षण प्रत्यक्ष प्रगट होत नसला तरी, स्त्री पुरुषाच्या आकर्षणातून शृंगारभाव रसिकमनात जागृत होतात. शरीर संवेदना जागवतात. वादळ (कातरवेळ क. क्र. १२) कवितेतील स्त्री म्हणते,

‘कुण्या देशीचे वादळ माझ्या अंगणात आले
झाडे झाली वेडीखुळी वेल देठातून हाले.’

वादळ म्हणजे तिच्या (स्त्री) आयुष्यात अचानक आलेला प्रियकर. तिच्या भावनांचे एकप्रकारे मुर्त रुपच. त्याचे तिच्या अंगणात येण्याबरोबरच ‘तिच्या’ हृदयाचे अंगण उन्मून येते.

वास्तविक पहाता या कवितेचा अथवा मंदा कदम यांच्या इतर कवितांचा आपण साकल्याने व कल्पकतेने अनुभव घेवू लागलो असता विविध प्रकारच्या अर्थसंगती संभवू लागतात. यापैकी अमूक एक अर्थ निश्चित आहे असे म्हणता येत नाही. मात्र कवितेचा रोख लक्षात येवू शकतो. निसर्गप्रतिमा, निसर्ग सौंदर्यातून आपल्या अनुभूती जाग्या होतातच त्याचबरोबर त्यांच्या काव्यातील

मानवी भावनांचेही दर्शन घडते. मातीला आभाळ भेटीची जशी ओढ असते तशी ओढ कवितेतील स्त्री मनाची आपल्याला दिसून येते.

मनाच्या विरहवेणा तृप्त तृष्णार्त धरणीसारख्या असतात. अशावेळी प्रियकराची ओढ पाऊसधारेतून जाणवते आणि आभाळ भेटीचा मोह निर्माण होतो. वादळ कवितेत येणारे आकाश हे त्याच्या (प्रियकराच्या) मनाचे रुप घेते तर 'माती' स्त्रीमनाचे. वैशाख वणव्यात होरपळणाऱ्या मातीला चिंब भिजवून टाकणारा पाऊस हवाहवासा वाटतो. त्याच्या अस्तित्वामध्ये पुर्णपणे मिसळून जावे अशी इच्छा होते. तसेच ह्या स्त्रीला आपल्या प्रियकराची जाणीव पाऊसधारेतून होते.

स्त्रीचे लावण्य, रुप,उफाळता देह, प्रेमव्याकुळता, भोग घेण्याची व देण्याची तयारी, तिची वेदना ना. धों. महानोर निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात साकार करतात. मंदा कदम यांच्या कवितेतील स्त्री मीलनानुभवाचा अनुभव घेताना दिसते.

'ऋतुनाद' मध्ये ती स्त्री धरती, रात्र, माती यांच्या रुपाने प्रकटते. तिचे स्वरुप भाव प्रकटतात ती म्हणते,

पाऊस असा दाराशी
करपाशी वेढून रात
धुडगूस असा वाऱ्याचा
मंतरला ओला श्वास

(ऋतुनाद पृ. क्र. १२)

या कवितेत प्रियकर पाऊसधारेतून येतो तर रात ही एक स्त्री वृत्ती. ती आहे चंचल, मोकळी, लावण्यवती, बदलत जाणारी. प्रियकर दाराशी येताच तो तिला आपल्या बाहूपाशात घेतो. मीलनोत्सवाची एक संवेदनामय जाणीव इथे प्रकर्षान होते. ती म्हणते,

धरतीच्या वक्षावरती
नाजूक कशाची नक्षी
उसकटतो पंख पिसारा
तो एक अनामिक पक्षी

इथे या कवितेत सारा कामानुभव, शृंगाराची उत्सुकता काव्यात्मक व गुढस्वरुप बनतो आणि धरतीची (स्त्री) प्रतिमा संवेदना संपन्न, भावसमृध्द व एकसंध बनते. निसर्गाच्या रुपामधून अनुभव घेण्याची तिची वृत्ती दिसून येते. पुढे ती म्हणते,

गार वाऱ्याचा थरार
अंग शहारुन आले
चिंब अंबराची मिठी
पान पान मोहरले

या कवितेत स्त्रीचा अनुभव निसर्गाच्या विविध रुपामधून तटस्थपणे घेतलेला दिसतो. स्त्री पुरुषामधील प्रेमक्रीडेचा सर्वव्यापी अनुभव आकाश, वारा, पाऊसधारा आणि धरती, झाड, माती ह्या स्त्री-पुरुष प्रतिमांच्या साक्षीने येतो.

आकाश म्हणजे मानवी मनाला (स्त्री) आकर्षून घेणारे सर्जनशक्तीचे एक निळे रुप : म्हणजे पुरुष. तर धरती म्हणजे त्या रुपावर मोहित झालेले एक मानवी मन.

थंडगार वाऱ्याचा थरार आल्याबरोबर तिचे शरीर अंगभर शहारुन येते, बहरते अशावेळी अंबराची (प्रियकराची) मिठी तिच्या शरीरअंगाला बसते. ती बहरते शरीरात आवेग येतो. बहरलेल्या तिच्या मनात प्रेमक्रीडा उत्पन्न होते.

या ठिकाणी मानवी मनातील कामभावाची जाणीव स्पष्टपणे होते. शेवटी माझे हरवले घर, तुमच्या झिम्माड मिठीत असे ती स्त्री म्हणते.

संयमीभाव :

बहुतेक कवयित्रीप्रमाणे प्रेम हाच विषय मंदा कदम यांच्या काव्यात प्राधान्याने येताना दिसतो. पण त्यांच्या काव्याचे महत्वाचे विशेष हे की त्यात एक प्रकारची विविधता आहे. प्रेमामध्ये मीलन, भेटीची हुरहूर, तीव्र व्याकुळता, उत्कटता, शृंगारभाव या भावांगाना महत्व असते. जितक्या जास्त प्रमाणात उत्कटता असते, तितक्याच प्रमाणात विरहता असते. तरीही प्रेमाच्या या अवस्थांमध्ये कवयित्री मंदा कदम यांची कविता संयम टिकवून आहे. ती म्हणते,

किती सांगू तुला, सगळा गंध उधळू नकोस

परत एकदा मेघदूत निर्माण व्हायला नको अशी विनवणी प्रेयसी आपल्या प्रियकराला करते. पुढे ती म्हणते,

आणखी एक मेघदूत उभवायचे का, तुझे माझे ? या ठिकाणी प्रेयसीने प्रियकराला केलेला प्रश्न रसिकांना अंतर्मुख करतो. इथे दिसणारा प्रियेचा संयम एकप्रकारे मनोबल निर्माण करतो.

'उठ सजणी' मध्ये असाच संयमी साजण आपल्याला भेटतो. तो म्हणतो,

उठ सजणी, उठ सजणी
उचल आता पाऊले
दुर नाही , दुर नाही
क्षितीज अपूले राहिले

असे तो प्रेयसीला समजावतो आहे.

एकंदर मदा कदम यांच्या कवितेतून बऱ्याचअंशी संयमीतपणाचे भाव प्रकटीत होतात. त्यांच्या काव्यात जरी प्रेमाला अग्रस्थान असले तरी भावनांचा प्रक्षोभ दिसत नाही. सर्वत्र दिसते ती भावनांची कोवळीक आणि हळूवारपणा.

## तृप्तभाव :

प्रेम म्हटलं की त्यामध्ये प्रेमभावना जागृत होणे, प्रियकराची प्रतिक्षा, त्याची आठवण कोरत राहणे, याचबरोबर विरहाची गहिरी दाट छाया, एकाकीपणा, वियोग प्रतारणा या छटा येतात. मानवी सृष्टीत प्रेमाच्या जाणिवेला अधिक अर्थपूर्ण असे स्थान असते. एखाद्या श्यामल सायंकाळी प्रेमपारवा घुमणे, प्रेमबाधा होणे, प्रेमाच्या ताणाबाणामुळे अस्वस्थता येणे ह्या घटना वारंवार घडतातच. अशा प्रसंगातही प्रियकर आणि प्रेयसीला होणारा तृप्तीचा आनंद वेगळाच असतो. त्याचा स्वीकार हे प्रेमवीर करीत असतात.

कवयित्री मंदा कदम यांच्या संग्रहात येणाऱ्या प्रेमकविता असंख्य आहेत. प्रेमभावनेच्या प्रवासातील सगळे टप्पे व्यक्त करताना कवयित्रीने निसर्गातील प्रतिमांचा आधर घेतला आहे. निसर्गात ज्याप्रमाणे पान, फुल, धरती आनंद उपभोगतात त्याप्रमाणे कवयित्रीच्या कवितेतील नायक-नायिका तृप्तभावनेचा आनंद उपभोगतात.

तसे पाहता प्रेमसाफल्याचा, तृप्तभावनेचा आनंद हा काही औरच असतो. ज्याने हे क्षण भोगले, ते जगला अशा तृप्तभावनेला कवयित्री शब्दरूप देते ते निसर्गाच्या ऐन्यातून,

आज नशेत पाऊस आणि बेहोषीत वारा
जुई ओलेती लाजते, करी अंबर इषारा
वाट अनंताची पाहे गंध सायलीचा खुळा
वेडी तगार जपते आज यौवन सोहळा

(कातरवेळ पृ. क्र. ३७)

'धारानृत्य' हे निसर्गवेड्या कवींना भुरळ घालणारे दृश्य असते. सहस्त्रधारांनी आवेगाने येणारा पाऊस, त्याच्या मीलनाचा, तृप्तीचा आनंद भोगणारी धरित्री स्त्री पुरुषाच्या मीलनानुभवाचे प्रतिक म्हणून येतात.

प्रियकर प्रेयसीला ज्याप्रमाणे प्रणयाचा आनंद होतो. तृप्त प्रेमभावनेने प्रणयगंधी रंगक्रिडेच्या शलाका ज्याप्रमाणे उधळल्या जातात त्याप्रमाणे निसर्गाचे ही असते. पाऊस आणि त्याच्या तृप्तीचा आनंद भोगणारी धरित्री यांचे वर्णन करताना कवयित्री म्हणते,

उधळल्या जातात
रंगक्रीडांच्या प्रणयगंधी सुगंधीत शलाका
तृप्तीच्या हुकारभरल्या मनाने
चिंब अंगांगावर ओलेतीच्या
तरारतात पुलक फुले
धुंकारणारी पारव्यागत

(कातरवेळ पृ. क्र. ३९)

प्रेमभावनेत घेतलेला तृप्तीचा आनंद, मीलनाचा भोगलेला महोत्सव तिच्या जीवनाला चैतन्याचा आनंद देतो. तृप्त तृषार्ता धरणीवर तो कोसळणाऱ्या पाऊसधाराप्रमाणे येणारा प्रियकर तिच्या गीष्मभोगल्या विरहव्यथांना सपंवतो तो तशा अपार्थिव आवेगाने यावा ही तिची मनोमन इच्छा असते.

हलके हलके जग विसरावे
आणि पडावी चांदणभूल
पल्याड शब्दांच्याहि रहावे
अद्वैताचे सुंदर फुल

(कातरवेळ पृ. क्र. २२)

पुढे ती म्हणते, कर्ण फुलांना तळहाताचा अनोख स्पर्श कळला होता. तृप्तीचा हा आनंद उपभोगताना करवंदीच्या डोहामध्ये दीठीचा चंद्र फसला होता. या अपूर्व क्षणांचे वर्णन करतान 'ती' म्हणते,

घुसमटलेल्या रेशिमवस्त्रा
झुळूक चावरी हसली होती
तृणांकुरांची हिरवी धरती
स्वप्नांची गहिवरली होती.

(कातरवेळ पृ. क्र. ५)

## वात्सल्यभाव :

मंदा कदम यांच्या कवितेते अनेक स्त्रीविध भावछटा तितक्याच सूक्ष्म संवेदनांनी अवतरतात. पण अशी एक स्त्री आहे की, जी एकमेव आहे. कवयित्रीच्या भावजीवनात तीला तसंच अनन्यसाधारण महत्व आहे.

'चंदनाचे देणे' या दीर्घ कवितेमध्ये 'ती' आरंभापासून अखरेपर्यंत आहे. सर्वत्र तिच्या आठवणी विखुरलेल्या आहेत. ही आजी आधारशील, परंपरेशी नाते असणारी, कवयित्रीला प्रेरणा देणारी, तिच्या अवघ्या भावविश्वात गुंतलेल्या कवयित्रीला प्रश्न पडतो,

'आजीचा प्रत्येक श्वास म्हणजे
माझ्या पायाखाली फुलं अंथरणं
तिचं माझ्यातलं असणं म्हणजेच माझं गाणं
तिला वजा केलं तर
उरेल एक कलेवर केविलवाणं

(चंदनाचे देणे पृ. क्र. १)

आपल्याला आजी नसणे हे कवयित्रीला वेदना देणारे आहे. तिच्याशिवाय जगणे म्हणजे तिला केविलवाणे झाले आहे असे ती म्हणते.

इथे आजीचे नातीशी असलेले नाते अद्वैत असे आहे. तिच्या आठवणी, तिच्याशी अलेले गडद नाते, गुढ नाते तीला वांरवार जाणवत राहते.

'चंदनाचे देणे' या संग्रहातून ग्रामीण जीवनाचे संस्कार आणि संस्कृतीची जपणूक करणारी स्त्री दिसते. ह्या स्त्रीचे रुप, तिचे विशिष्ट सांस्कृतिक, कौटुंबिक जीवन कवितांमधील शब्दाशब्दामधुन प्रकट होते.

एक प्रगल्भ जीवनदृष्टी असलेली, निरक्षर असूनही सुसंस्काराचे सहज शिक्षणदेणारी, मूल्यभाव जपणारी स्त्री 'चंदनाचे देणे' ह्या दोर्घ काव्यसंग्रहातील कवितांच्या केंद्रस्थानी आहे.

आपण करावे आणि काय करु नये याचे तत्वज्ञान सांगणारी आजी कवयित्रीवर फार प्रेम करत असे. कवयित्री एक वर्षाची असताना त्यांची आई निघून गेली. तेंव्हापासून कवयित्रीच्या आयुष्याची जबाबदारी आजीने घेतली. कधी रागावून तर कधी शांतपणे तिने मंदाताईवर संस्कार केले.

शाळेत छडी बसल्याने लाल झालेल्या हाताला आजीच्या मायेचा स्पर्श होताच त्याच्या वेदना नाहीशा होतं. प्रेमाने बोलावे, गाणे गुणगुणावे, व्रतवैकल्ये करावी, रांगोळी घालावी, भाकरी करताना पीठ नीट मळावे, कुंकू संपलं न म्हणता कुंकू वाढलं असे म्हणावे. अशा प्रकारचे तत्वज्ञान सांगणारी आजी एक कल्पवृक्षच होती. कुठल्याही ग्रंथात न सापडावे असे तत्वज्ञान आजीच्या शब्दाशब्दातून व्यक्त होत असे.

एखाद्या समारंभात 'बाई' जायाची पण 'अंबुताई' नाही जेवायच्या. पक्वानांचा घास नातीच्या आठवणीने आजीच्या घशातच अडकायचा. आजी आणि नात यामध्ये असणारे हे नातं वात्सल्यभाव, त्यांचे एकमेकात गुंतलेले मन वरील ओळीतून स्पष्टतर होतेच पण कवयित्री जेंव्हा संसाराचा भार सांभाळून माहेराला जेंव्हा येते तेंव्हा आस्थेने चौकशी करणारी आजी (स्त्री) आपल्याला भेटते. ती म्हणते,

कधी आली गं बाई
कशी आहेस गं मैने
का गं कोमेजली जाई
बोल येती जिव्हाळ्याने

(सांजगवेळा पृ. क्र. ६८)

वरील काव्यात आपणाला आजीचे आपल्या नातीविषयी असलेल्या वात्सल्याचे दर्शन होते. तसे पहाता प्रत्येक स्त्रीचे आपल्या माहेराशी जीवभावाचे नाते असते. जीवनाची वाटचाल करताना स्त्रीला जेंव्हा थकल्यासारखे वाटते तेंव्हा ती माहेरच्या प्रेमाला उत्सुकलेली, आसुसलेली असते. अशावेळी जिव्हाळ्याने, ममत्वाने , वात्सल्याने भरलेली हाक तिला ऐकू येते आणि ती आनंदून जाते.

वरील काव्यातून ह्या स्त्रीच्या मनाचे हेच भाव स्पष्टपणे प्रकटतात. इथली आजी आपल्याला नातीविषयी विचारपूस करते आहे. 'कधी आलीस गं मैने' असे ती म्हणते. इथे कवयित्री बद्दलचा वात्सल्यभाव आजीच्या शब्दातून स्पष्टपणे दिसून येतो तर 'का गं कोमेजली जाई' या समर्पक सूचक वृत्तीतून संसाराच्या ओझ्याने थकून गेलेल्या स्त्रीरुपाचे दर्शन घडते. त्याचबरोबर आस्थेने चौकशी करणाऱ्या स्त्री मनाचे भाव दिसून येतात. पुढे ती म्हणते,

दमदार पाळण्यामध्ये
झुलतात सावळी बाळे
बीजातून हिंदळतात
रुणझुणती घुगरवाळे

(साजणवेळा पृ. क्र. ६२)

लहान मुलांच्या हालचालींचे, बागडण्याचे , बोबड्या बोलांचे आकर्षन सर्वांनाच असते. कित्येक कवींनी अशा बालकांच्या मनोविश्वाचा वेध घेतला आहे. ग. ह. पाटील, वि. म. कुलकर्णी, भा. रा. तांबे , बालकवी यांनी प्राथमिकत: तर करंदीकर, निकुम्ब, संजीवनी मराठे, सरिता पदकी, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, सदानंद रेगे, शिरिष पै, राजा मंगळवेढेकर, या आधुनिक कवींनी घेतला आहे.

कवयित्री मंदा कदम यांच्या काव्यातून व्यक्त झालेला वात्सल्यभाव कवयित्रीच्या जगण्याचा एक अमुल्य ठेवा आहे. पाळण्यामध्ये जशी बाळं झुलतात तशी त्यांची घुंगुरवाळे रुणझुणतात. त्याचा येणारा मधुर स्वर, त्या मातेला प्रसन्न करत असतो. म्हणून ती म्हणते,

या अशा क्षणांच्यासाठी
मनी भरुन यावा पूर.

मातृत्व हे प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील एक महत्वपूर्ण घटना आहे. बाळाचे हसणे, रडणे त्या स्त्रीला आनंद देत असते. त्याचे अंगाखांद्यावर खेळणे तिला गोड वाटत असते. म्हणून ती म्हणते,

किती कोवळी कोवळी
त्याची गळ्यापाशी मिटी
आज पदरात भेटं
माझ्या तान्हुल्याची दिठी

(ऋतुनाद पृ. क्र. ३७)

एका निरागस बालकाच्या बागडण्याचा आणि त्याच्या मातेच्या प्रेमळपणाचे दर्शन इथे आपणाला होते.

एकंदर मंदा कदम यांना आपल्या कवितांतून कौटुंबिक जीवनातील, संसारातील साध्या साध्या गोष्टींची जी वात्सल्ययुक्त अनुभूती आली तिने एकूण त्यांच्या काव्यांचा बराच भाग व्यापला आहे.

अर्वाचीन कवींनी ज्याप्रमाणे बालकांच्या मनोविश्वासी समरस होवून, आंतरिक जिव्हाळ्याने त्यांचे भाव टिपले आहेत. त्याचप्रमाणे मंदा कदम यांनी हळुवार शब्दात उत्कट भाव टिपले आहेत.

## सारांश :

प्रबंधिकेच्या या प्रकरणात आपण कवयित्री मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळा, चंदनाचे देणे आणि ऋतुनाद या सग्रहातून व्यक्त झालेली स्त्रीमनाची भावस्पंदने विविध प्रसंगातून कशी आलेली आहेत याचा शोध घेतलेला आहे. संपूर्णत: प्रेमाच्या विविध छटा ज्या संग्रहातून व्यक्त झाल्या आहेत त्यामध्ये आलेले स्त्री भाव निसर्गाच्या विविध प्रतिमांतून प्रकट झाले आहेत. याचा शोध घेतला आहे.

प्रेमामध्ये येणाऱ्या स्त्री - पुरुष मनाच्या भावशलाका, मीलनोत्सुकता, मीलन, आठवणी, प्रतीक्षा तसेच प्रीतीच्या कपाळी विरहाची व्यथा तर असतेच त्यामुळे वियोग, प्रतारणा, एकाकीपणाचे दु:ख इत्यादीतून स्त्रीभाव प्रकटले आहेत. कातरवेळ संग्रहातील कविता विविधांगी विषयाने भरलेली आहे. परंतु प्रेम हाच या संग्रहातील कवितांचा आशयबिंदू आहे. इथे निसर्गाच्या विविध प्रतिमांतून

मीलन, प्रतिक्षा, प्रेमसाफल्याची तृप्तभाव कवयित्रीने प्रस्तुत केला आहे. तर साजणवेळा मध्ये संपूर्णता प्रेमकविता आहेत. अपवाद वगळता साजणवेळा आणि चंदनाचे देणे या संग्रहातून आलेल्या वात्सल्य भावाचे स्पष्टीकरण केले आहे. तर ऋतुनाद संग्रहातील कविता निसर्गाच्या आधारे मानवी भावना प्रकट करतात. निसर्गाप्रमाणे चालणारे मानवी जीवन कवयित्रीने निसर्गप्रतिमांच्याद्वारे दाखविले आहे. एकंदर मंदा कदम यांच्या काव्यातुन व्यक्त झालेले मानवीसंबंधाबद्दलचे भाव, विरहभाव, शृंगारभाव, संयमीभाव, तृप्तभाव, वात्सल्यभाव यामधून स्त्रीमनाचा शोध घेतला आहे.

## सदर्भ :

१) सुहृदयगाथा : पु. शि. रेगे : संपा : गंगाधर पाटील :कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे - ३० : पृ. ३

२) खुणगाठ : ना. घ. देशपांडे : मुंबई १९८५ प्रस्तावना : पृ. २०

३) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर १९९१ : प्रस्तावना

४) तत्रैव : पृ. १

५) साजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००१ : पृ.१९

६) तत्रैव : पृ. १२

७) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर १९९१ : पृ.१९

८) तत्रैव : पृ. २०

९) साजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००१ : पृ.३२

१०) तत्रैव : पृ. २७

११) तत्रैव : पृ. ३३

१२) तत्रैव : पृ. ३२

१३) ऋतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००४ : पृ.१

१४) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर १९९१ : पृ.१०

१५) तत्रैव : पृ. २४

१६) तत्रैव : पृ. २१

१७) तत्रैव : पृ. ४७

१८) तत्रैव : पृ. ५५

१९) तत्रैव : पृ. ५६

२०) ऋतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००४ : पृ.२

२१) तत्रैव : पृ. २४.

२२) साजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००१ : पृ.३२

२३) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर १९९१ : पृ.१२

२४) उद्धृत अर्वाचीन मराठी काव्यदर्शन : डॉ. अक्षयकुमार काळे :पा.ना. वानहट्टी प्रकाशन नागपूर : १९९९ : पृ.५९७

२५) ॠतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००४ : पृ.१२

२६) तत्रैव : पृ. १०

२७) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर १९९१ : पृ.६,७

२८) तत्रैव : पृ. ३७

२९) तत्रैव : पृ. ३९

३०) तत्रैव : पृ. ३२

३१) तत्रैव : पृ. ५

३२) चंदनाचे देणे : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००४ : पृ.१

३३) साजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००१ : पृ.६८

३४) तत्रैव : पृ. ६२

३५) ॠतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हूपर २००४ : पृ.२७